क्र.मरारविम/०२/प्रशासन/ ७२०४
दिनांक : १३.०२.२०१९

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

कार्यालयीन आदेश क्र. ७२

**विषय:-** महामंडळाच्या सह व्यवस्थापकीय संचालक यांना प्रसार माध्यमांना माहिती देण्यासाठी महामंडळाच्यावतीने 'अधिकृत प्रवक्ते' म्हणून नियुक्ती करण्याबाबत...

**संदर्भ:-** महामंडळाचे कार्यालयीन आदेश क्र.१९९, दि.२१.०७.२०१७.

उपरोक्त विषयावरील संदर्भिय कार्यालयीन आदेशान्वये श्री.किरण कुरुंदकर, सह व्यवस्थापकीय संचालक (प्रशासन व वित्त) यांची महामंडळ राबवित असलेल्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांबाबत प्रसार माध्यमांना माहिती देण्यासाठी महामंडळाच्या वतीने महामंडळाचे 'अधिकृत प्रवक्ते' म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. तसेच सर्व विभाग प्रमुखांनी त्याच कडील प्रकल्पांबाबतची अद्ययावत माहिती सह व्यवस्थापकीय संचालक (प्रशासन व वित्त) यांचेकडे देण्याची जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखांची राहिल असेही नमूद करण्यात आले होते.

तथापि, आता प्रशासकीय कारणास्तव आता महामंडळात भारतीय प्रशासन सेवेतील कार्यरत दोन अधिकारी - **सह व्यवस्थापकीय संचालक (२) व सह व्यवस्थापकीय संचालक (३) तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेले सह व्यवस्थापकीय संचालक (अभियांत्रिकी १) या तीनही अधिका-यांना महामंडळाच्या वतीने प्रसार माध्यमांना माहिती देण्यासाठी 'अधिकृत प्रवक्ते' म्हणून घोषित करण्यात येत आहे.**

तरी याबाबत महामंडळातील सर्व अधिका-यांनी योग्य ती नोंद घ्यावी व सर्व विभाग प्रमुखांनी त्यांचेकडे सोपविण्यात आलेले विषय / प्रकल्पांबाबतची अद्ययावत माहिती वेळोवेळी संबंधित सह व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे सादर करावी. तसेच वर नमूद केल्यानुसार सह व्यवस्थापकीय संचालक वगळता त्यांच्यापेक्षा कनिष्ठ कोणत्याही अधिका-यांनी प्रसार माध्यमांना थेट माहिती देऊ नये याची दक्षता घ्यावी.

सदर आदेश उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(मंगेश शिंदे)
महाव्यवस्थापक (प्रशासन)
म.रा.र.वि.म.मर्या., मुंबई

प्रति,

१. सह व्यवस्थापकीय संचालक (२), म.रा.र.वि.म.(मर्या.), मुंबई.
२. सह व्यवस्थापकीय संचालक (३), म.रा.र.वि.म.(मर्या.), मुंबई.
३. सह व्यवस्थापकीय संचालक (अभि.१), म.रा.र.वि.म.(मर्या.), मुंबई.

प्रत माहितीस्तव:

१. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.रा.र.वि.म.(मर्या.), मुंबई.
२. सर्व विभाग प्रमुख, म.रा.र.वि.म.(मर्या.)
   - यांनी सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त कार्यरत सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास आणावे व त्यानुसार परिपत्रकाची अंमलबजावणी होईल याची खबरदारी घ्यावी.
३. सर्व अधीक्षक अभियंते, म.रा.र.वि.म.(मर्या.).
४. सर्व शिबीर कार्यालये, म.रा.र.वि.म.मर्या..
५. प्रणाली प्रशासक, म.रा.र.वि.म.(मर्या.), मुंबई.- यांना महामंडळाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी.
६. दस्ताऐवज अधिकारी, म.रा.र.वि.म.(मर्या.), मुंबई.- यांना ग्रंथालयाच्या प्रतीसाठी.
७. वैयक्तीक नस्ती / निवड नस्ती.

निगम कार्यालय : वांद्रे रेक्लेमेशन डेपोसमोर, लिलावती हॉस्पिटल जवळ, के.सी. मार्ग, वांद्र(प), मुंबई- ४०० ०५०.
दूरध्वनी : ०२२-२६४००१९०/२०१, २६५५८१७५/७६ फॅक्स: ०२२-२६४१७८९३

नोंदणीकृत कार्यालय: नेपियनसी रोड, प्रियदर्शिनी पार्क शेजारी, मुंबई- ४०० ०३६.
दूरध्वनी: ०२२-२३६८५९०१ / २३६१३७८९/ २३६११०३०
वेबसाईट: www.msrdc.org सीआयएन : U45200MH1996SGC101586

Scanned by CamScanner